# पाचूचे बेट

लीलाधर हेगडे



BVBK-0403000

बा·वा·
3000
९८५/७८

# पाचूचे बेट

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. 3000 दिनांक ९८५/७८
विषय बा·वा· क्र.........

लीलाधर हेगडे

केंद्र व महाराष्ट्र सरकारच्या बालवाङ्मय स्पर्धेत
पहिल्या पारितोषिकाचे मानकरी पुस्तक

BVBK-0403000

साधना प्रकाशन : पुणे - ४११ ०३०

पाचूचे बेट

© लीलाधर हेगडे

चौथी आवृत्ती : ११ जून १९९४

मुद्रक / प्रकाशक :
कुमुद करकरे
साधना प्रेस / साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : प्राणेश जोशी

आतील चित्रे : प्रभाकर गोरे

किंमत : रु. २०/-

# १ : पाचूचे बेट

ते बेट फारच सुंदर होते. दिसायला आणि असायलाही. मोठमोठे वृक्ष वाढले होते बेटावर. अगदी नाना प्रकारचे. कोणाचे खोड हे अगडबंब, तर कोणाची उंची आभाळाला भिडेल अशी. कोणाचा विस्तार मोठा तर कोणी सुळक्यासारखे. कोणाची पाने फत्ताडी तर कोणाची निमुळती टोकदार. काहींची पाने गडद हिरवी, काहींची फिक्कट हिरवी, काहींची पोपटी. काही झाडांना हिरव्या रंगाचा कंटाळा आला होता म्हणून कोणी आपल्या पानांना लाल रंग दिला होता तर कुणी चॉकलेटी. काहींनी पिवळाच रंग पसंत केला होता. काही झाडांवर मोहक वासांची सुंदर फुले होती. वारा येई आणि तो सुगंध सगळीकडे घेऊन जाई. फळांची तर नुसती रेलचेल! काही विचारू नका! फळेच फळे. रसाने भरलेली. काही गोड गोड, काही आंबटचिंबट, काही आंबटगोड.

हिरव्यागार गवताला तर काही तोटा नव्हता. ते मन मानेल तिथे उगवले होते. अगदी दगडाच्या भेगांतून देखील.

बेटावर एक सुंदर डोंगर होता. त्यावरही दाट झाडी, गवत होते. माथ्यावर जाऊन भोवती पाहिले की वाटायचे, आपण खूप खूप मोठ्या अशा हिरव्या गालिचावरच जणू उभे आहोत!

डोंगरातून एक जिवंत झरा वाहत होता. खळ् खळ् खळ् खळ्! दुरून ऐकले तर वाटे कोणी वनदेवता पायांत घुंगुर बांधून नाचत तर नसेल? आणि जवळ जाऊन पाहिले की, ते खळाळून वाहणारे पाणी फेसामुळे पांढरेशुभ्र दिसे. जसे काही दूधच वाहत आहे!

झऱ्यामुळे डोंगराच्या पायथ्याशी एक सुंदर आणि मोठा तलाव तयार झाला होता. पाणी कसे गारेगार, गोड, निर्मळ आणि स्वच्छ होते!



भोवतालची झाडे त्यात आपला चेहरा पाहत, ऋतुमानाप्रमाणे आपला वेष बदलत आणि तलावाचा उपयोग आरशासारखा करीत.

बेटावर सुबत्ता होती. ऊन, पाऊस, वारा सदा सेवेला तयार होते. कधी कोणी आपल्या कामात आळस केला नाही. त्यामुळे बेट नेहमी हिरवेगार दिसे. भोवताली निळा समुद्र आणि त्यात हा हिरवा पाचू!

मात्र त्या बेटावर माणसाने अजूनपर्यंत पाऊल ठेवले नव्हते. बेटावर वस्ती होती ती पशू आणि पक्ष्यांची. तेथे नाना प्रकारचे पशू होते. अगदी सिंह, हत्तीपासून तो लहानग्या खारीपर्यंत. आणि पक्षी होते ते गरुड, राजहंसांपासून कावळ्याचिमण्यांपर्यंत.

त्यांची चंगळ होती. भरपूर खावे, भरपूर प्यावे. आनंदाने उडावे, बागडावे. कोणाची कोणाला भीती नव्हती.

पशू आणि पक्षी दोघेही त्या बेटावर आनंदाने राहत होते. पण पुढेपुढे एकमेकांसंबंधी गैरसमज निर्माण होऊ लागले. त्याला कारणेही तशीच घडली.

बिटुकली खार कधी कधी पक्ष्यांसारखी शीळ घाली. काही पक्ष्यांना वाटले हा पशू आपली नक्कल करतो, आपली टिंगल करतो. आपल्याला उगीचच चिडवतो. म्हणून त्यांनी मनात अढी धरली.

एकदा काय झाले, हत्तीच्या पाठीवर होती मुंगी. ती चालली होती हत्तीच्या कानाजवळ. हत्तीला काही ह्याचा पत्ताही नव्हता. तो चालला होता डुलत डुलत. पण त्या मुंगीला पाहिले चिमणीने. ती बसली होती



झाडावर. तिला वाटले मुंगी हत्तीच्या कानात शिरून चावा घेणार आणि त्याला हैराण करणार. म्हणून ती झाडावरून भुर्रकन् उडाली अन् हत्तीच्या पाठीवर जाऊन बसली. हत्तीच्या पाठीवर टुणटुण् उड्या मारीत ती मुंगीपर्यंत गेली अन् तिने मुंगीला गट्टम् करून टाकले!





हत्तीला मनातून राग आला. त्याला वाटले हा एवढासा पक्षी, खुशाल माझ्या अंगावर नाचतो! फारच उद्धट आहे. ह्यांना उडता येते त्याचा हे असा गैरफायदा उठवतात. आमचा अपमान करतात.

पक्ष्यांना चिडवणारा आणखी एक प्रकार माकडाकडून घडला. माकड बसले होते झाडावर फळ खात. खाता खाता चुकून त्याच्या हातातले फळ निसटले अन् कावळ्याच्या

घरट्यावर जाऊन पडले! कावळ्याच्या पिल्ला॑ । काही इजा झाली नाही, पण सर्व कावळ्यांनी केवढी काव काव केली ' 'माकडाने आमच्या पिलांचा नाश व्हावा म्हणून मुद्दामच ही खोडी केली,' असे कावळ्यांना तर वाटलेच, पण इतर पक्ष्यांनाही वाटले.

त्यानंतर आणखी एक गोष्ट घडली. त्या गोष्टीचा संबंध प्रत्यक्ष सिंहाशी आला.

सिंह ाळ्याच्या काठाने लंगडत लंगडत आप ग्र गुहे ' चालला होता. त्याच्या पायात गेला होता काटा. त्याच वेळी एक बगळा तळ्याच्या काठावर मासे पकडण्यासाठी एका पायावर उभा होता. सिंह चालला आहे हे पाहताच तो दोन पावले पलीकडे सरकला. पण सरकला तो एका पायावर. लंगडत लंगडत!

सिंहाचे त्याच्याकडे लक्ष होते. त्याला वाटले, 'मी ह्या वनाचा राजा आणि हा यत्किंचित् बगळा माझी अशी चेष्टा करतो काय! माझ्या पायातला काटा आपल्या टोकदार चोचीने काढायचा सोडून उलट हा माझी



टिंगलच करतो आहे! काही नाही. ह्या पक्ष्यांना माज चढला आहे कसला तरी. उडता येते ना! एवढीशी चिमणी खुशाल हत्तीवर नाचून गेली. आणि आता हा बगळा मला लंगडून दाखवतो आहे. ठीक आहे. पाहून घेऊ.'

इकडे पक्ष्यांनाही वाटायला लागते की, पशू फारच शिरजोरी करू लागले आहेत. खारीसारख्या हलक्या पशूने शीळ घालून आमची चेष्टा करावी काय? माकडाने खुशाल आमच्यापैकी एकाच्या घरट्यावर मुद्दाम फळ फेकावे काय? आमच्या पिलांचा नाश झाला म्हणजे सुटले एकदाचे!

गैरसमजातून गैरसमज वाढत गेले. दोघे एकमेकांशी बोलले असते तर काय बिघडले असते? एकमेकांसंबंधीचा संशय दूर झाला नसता? पण नाही. तसे व्हायचे नव्हते.

मग पशूंनी एक गुप्त बैठक घेतली. सिंह म्हणाला, 'माझी त्या क्षुद्र बगळ्याने चेष्टा केली.'

'माझ्या पाठीवर ती चिमणी खुशाल नाचली. माझी सोंड आणखी लांब असती तर चांगली पकडली असती अन् केला असता चेंदामेंदा.' हत्ती म्हणाला.

'एकूण काय, पक्षी माजले आहेत!' कोल्हा म्हणाला.

'होय नक्कीच. त्यांच्या मनात आपल्यासंबंधी काही तरी काळेबेरे आहे खास.' सिंह म्हणाला, 'तेव्हा बंधूंनो, आता एकटेदुकटे हिंडू नका. कळपाकळपाने रहा.'

मग पशू कळपाकळपाने राहू लागले. हरणांवर देखरेखीसाठी काळविटाची नेमणूक झाली. हत्तींच्या कळपावर एक म्हातारी हत्तीण देखरेख करू लागली. माकडांच्या टोळक्यावर एक बळकट हुप्प्या नेमला गेला. असे टोळीप्रमुख नेमले गेले.

'आपणही काळजी घ्यावी महाराज.' कोल्हा सिंहाला म्हणाला.

'माझी काळजी करू नका. कोणाची हिंमत आहे माझ्यापुढे यायची? मी एकटा हिंडेन.' सिंह म्हणाला.

पशूंच्या गुप्त बैठकीची कुणकुण पक्ष्यांना लागली. सिंहाच्या गुहेत



काळोखात राहणाऱ्या पाकोळीने ही बातमी त्यांना पुरविली.

मग पक्ष्यांचीही गुप्त बैठक झाली. 'पशूंची गुप्त बैठक होऊन ते आता टोळ्याटोळ्यांनी हिंडू लागले आहेत. त्यांच्या मनात काही तरी काळेबेरे आहे.' गरुड म्हणाला.

'नक्कीच. नाही तर माकडाने माझ्या घरट्यावर फळ कशाला फेकले असते?' कावळा म्हणाला.

पशूंच्या मनात आपल्यासंबंधी काही तरी काळेबेरे आहे यावर सर्वांचे एकमत झाले. 'बंधूंनो, टोळ्याटोळ्यांनी रहा. एकटेदुकटे हिंडू नका. शत्रू आपल्या वाइटावर आहे.' गरुड म्हणाला.

गरुड राजाची आज्ञा सर्व पक्ष्यांनी पाळली. त्यांनी सुद्धा टोळ्या केल्या. आता पशू आणि पक्षी दोघेही टोळ्या टोळ्या करून राहू लागले. त्यामुळे एकमेकांची एकमेकांना जास्तच भीती वाटू लागली.

मग काही पशू दिवसा फिरेनासे झाले. सबंध दिवस गुहेतच राहत आणि रात्र झाली की बाहेर पडत.

आणि पक्षीही सूर्य जरा का मावळतीला झुकला की घरी येऊ लागले.

गैरसमजातून गैरसमज वाढले. त्यातून एकमेकांविषयी संशय निर्माण झाला. संशयातून भीती निर्माण झाली. त्या सुंदर बेटावरचा आनंद नाहीसा झाला. आनंदाची जागा भीतीने घेतली.

## २ : ठिणगी पडली, वणवा पेटला

एके दिवशी काय झाले, एक लांडगा त्या तलावावर पाणी पिण्यासाठी आला. तिथेच एक गिधाड तळ्याच्या काठी बसून पाणी पीत होते.

लांडगा म्हणजे बिनडोक. आणि शिवाय चिडखोर. गिधाडाला बघून म्हणाला, 'आमच्या तळ्याचे पाणी उष्टावून खराब करू नकोस. तू मेलेल्या प्राण्यांचे शिळे मांस खातोस. आमच्या तळ्याचे पाणी खराब होईल.'

गिधाड म्हणाले : 'अरे वा रे वा! तू तरी काय दर वेळी ताजे मांस थोडेच खातोस? सिंहाने नाही तर वाघाने शिकार करावी आणि उरलेले उष्टे तू खावेस ही तर तुझी रीत! तूच ह्या पाण्याला शिवू नकोस.'

गिधाडाच्या ह्या असल्या उत्तराने लांडग्याला राग आला. 'हे आम्हां पशूंचे तळे आहे. येथे तुमच्यापैकी कोणीही येता कामा नये समजलात.' लांडग्याने दम भरला.

'अरे जा रे जा! ते तळे काय तुमच्या बापाचे आहे? तळे आहे आम्हां पक्ष्यांचे.' गिधाडाने पशूंचा बाप काढावा ही गोष्ट लांडग्याला आवडली नाही. त्याचा राग अनावर झाला. पायाची आग मस्तकाला गेली. काही विचार न करता त्याने गिधाडावर झडप घातली.

गिधाड तयार होतेच. ते जागच्याजागी पटकन् उडाले आणि जवळच्या झाडावर बसले. त्यानी फिदी फिदी हसून लांडग्याची हुर्यो केली.

झालेल्या प्रकाराची बातमी हां हां म्हणता सर्व बेटभर पसरली. निरनिराळ्या बातम्या पशूंच्या आणि पक्ष्यांच्या कानावर गेल्या. शेवटी पशूंनी लांडग्याला गाठला अन् त्याच्या भोवती गर्दी केली.



'काय झाले? गिधाडाने तुझ्यावर हल्ला केला काय?' सिंहाने विचारले.

मग लांडग्याने तिखटमीठ लावून झालेल्या प्रकाराची माहिती सांगितली. गिधाडाच्या उद्दामपणाचा सर्वांनाच राग आला.

गिधाडाने पक्ष्यांना खुलवून माहिती सांगितली. 'पंख होते म्हणून ठीक. नाही तर माझी काही धडगत नव्हती,' गिधाड म्हणाले.


पशू व पक्षी दोघेही भडकले.

गिधाडाचा उद्धटपणा ऐकून काही पशू दात खाऊ लागले. काही जमिनीवर आपल्या शेपट्या आपटू लागले. काहींनी आपले केस पिंजारले.

'पक्ष्यांचा बदला घ्या.' पशू ओरडले, 'तळे आमचे आहे.'

सिंह म्हणाला : 'चला, सर्व जण त्या तळ्यावर चला.'

मग सर्व प्राणी तळ्याकडे निघाले. गर्जना करीत निघाले. सिंह, वाघ, हत्ती, गेंडा, लांडगा, कोल्हा, हरीण, जिराफ, कांगारू, माकड- असतील नसतील तितके सारे झाडून निघाले.



सर्व जण ओरडत होते : 'पक्ष्यांचा बदला घ्या, तळे आमचे आहे.'

इकडे पक्षीही खवळले. 'गिधाडावर लांडग्याने हल्ला केला काय? बघून घेऊ.'

सर्व पक्षी आपल्या चोची झाडावर आपटू लागले. काहींनी आपली पिसे पिंजारली.

'चला त्या तळ्यावर.' गरुड म्हणाला

पक्षीही गर्जना करीत तळ्यावर निघाले. गरुड, गिधाड, ससाणे, राजहंस, कलहंस, चक्रवाक, घुबड, घार, कावळे, चिमण्या– असतील नसतील तितके झाडून सारे निघाले. गर्जत निघाले : 'तळे कोणाचे? पक्ष्यांचे!'

३०००



'पशूंचा बदला घ्या!'

पशू-पक्षी दोघेही त्या तळ्यावर आले. दोघेही मोठमोठ्याने ओरडत होते. कोणीही कोणाचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

बोलाचालीवरून भांडाभांडी, भांडाभांडीवरून धक्काबुक्की, धक्काबुक्कीवरून लट्ठालट्ठी सुरू झाली.

सिंहाने प्रचंड गर्जना केली. पक्ष्यांनो, ऐका. आजपासून तुमचे आणि आमचे युद्ध सुरू झाले. तुमचा नायनाट केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.'

सर्व पशूंनी आपला आवाज सिंहाच्या आवाजात मिळविला.

'तुमचा नायनाट केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.'

गरुडानेही गर्जना केली : 'पशूंनो ऐका. आम्ही पक्षी तुमचे आव्हान स्वीकारतो. तुमचा नायनाट केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.'

सर्व पक्ष्यांनी गरुड राजाच्या आवाजात आपला आवाज मिळविला.

'तुमचा नायनाट केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.'





ज्या बेटावर आनंदाचे राज्य होते तेथे आता द्वेषाने आपले ठाण मांडले. प्रत्येक जण सूडाची भाषा बोलू लागला.

एकमेक एकमेकांच्या जिवावर उठले.

त्या दिवसापासून पशुपक्ष्यांचे युद्ध सुरू झाले. घनघोर युद्ध!

पशूंना उडता येत नव्हते. त्यामुळे कित्येकदा त्यांना हार खावी लागत असे.

गरुड, ससाणे, गिधाडे, यांच्या पराक्रमाला सीमा राहिली नाही. ससाण्यांत तर किती तरी पराक्रमी जाती. हारिन्, सुपर्ण, वैनतेय, बहिरी, लगार यांनी तर धमाल उडवून दिली. ते आभाळातून तीरासारखी खाली झेप घेत; पशूंचे लचके तोडत आणि झटकन् आभाळात भरारी मारीत.

एखादा पक्षी एखाद्या पशूच्या पुढे येऊन बसे. पशूचे त्याच्याकडे लक्ष गेले की तो त्यावर झेप घालण्याच्या तयारीत असे. इतक्यात मागून कोणता तरी पक्षी त्याच्यावर हल्ला करी.

ही पक्ष्यांची युक्ती साळूने मात्र उधळून लावली. तिच्यासमोर एखादा पक्षी आला की ती आपले केस ताठ करी. अगदी बाणासारखे. अन् झटकन् मागे मुसंडी मारी. त्यामुळे हल्ला करणाऱ्या पक्ष्याच्या अंगात साळूचे केस बाणासारखे रुतत आणि तो घायाळ होऊन खाली पडे.

पक्ष्यांनी साळूचा नाद सोडून दिला. मात्र बाकीच्या पशूंना त्यांनी हैराण केले.

मग पशूंनी निराळी युक्ती योजिली. सर्व पक्षी झाडावर झोपले की त्यांच्यावर जाऊन हल्ला करावा असे त्यांनी ठरविले.

त्याप्रमाणे काही पशूंची नेमणूक झाली. ते पशू रात्री पाऊल न वाजवता झाडावर चढत आणि पक्ष्यांना मारून टाकीत. त्याची अंडी, पिले खात. कारण पक्ष्यांना रात्रीचे दिसत नसे.

मग पक्ष्यांनी घुबडाला रात्री पहाऱ्यावर बसविले. पशूंची चाहूल लागली की, घुबड मोठा आवाज काढी. 'घुक् घुक्.'





पण असे ओरडण्याची पाळी त्याच्यावर अनेकदा येई. त्यामुळे पक्ष्यांचा डोळा लागेनासा झाला. पक्ष्यांची झोप उडाली.

मग पक्षीही चवताळले. त्यांनी ह्या गोष्टीचा सूड घ्यायचा असे ठरविले. 'आम्ही झोपलो असता आमच्यावर हल्ला करता काय? काही युद्ध-धर्म म्हणून आहे की नाही? ठीक आहे. ह्यांना चांगलाच धडा शिकवू. आमची पिले खातात लेकाचे!'

मग त्यांनी पशूंचे बच्चे पळवायला सुरुवात केली. 'ह्या पशूंचा वंशच नाहीसा करून टाकू.' असे पक्ष्यांनी ठरविले.

गरुडाने सिंहाचे दोन छावे आकाशात पळविले. उंचावरून खाली फेकून दिले आणि मारून टाकले. अगदी सिंहिणीच्या देखत.

सिंहिणीला मरणप्राय दुःख झाले. बिचारी अश्रू ढाळीत गुहेत बसली.

तितक्यात सिंह गुहेत आला. सिंहिणीला रडताना पाहून त्याला आश्चर्य वाटले. तो तिला म्हणाला : 'असं रडायला काय झालं?'

सिंहाचा हा प्रश्न ऐकून सिंहिणीला आणखी रडू कोसळले. कसेबसे हुंदके आवरून ती म्हणाली : 'किती दिवस चालणार हे युद्ध?'

'आपण सर्वांनी तळ्यावर केलेली प्रतिज्ञा विसरलीस का? पक्ष्यांचा नायनाट झाल्याशिवाय हे युद्ध थांबणे शक्य नाही. समजलीस.'

'तुम्हांला आईचे दुःख कसे कळणार? माझ्या डोळ्यांपुढे माझे दोन छावे ठार मारले गेले. चार महिने त्यांचा भार मी वाहिला होता. तुम्हांला त्याच्यातले काय कळणार? आपण तर प्रत्यक्ष राजवंशातले. सर्व पशूंत आपण पराक्रमी. आणि आपली ही दशा. मग इतर पशूंची काय कथा झाली असेल? कृपा करा आणि हे युद्ध थांबवा. नाहीतर आपल्या सर्वांचाच नाश होईल.' सिंहिणीला भडभडून आले.

सिंहिणीचे हे भाषण ऐकून सिंह जास्तच खवळला. आपले छावे त्या दुष्ट पक्ष्याने पळविले काय? त्याने आपली आयाळ पिंजारली आणि सिंहिणीच्या अंगावर वसकन् ओरडून म्हणाला : 'भागूबाईसारखं रडायला काय झालं? ह्याचा बदला मी घेणार. लहानग्यांना ठार मारायला ह्यांना लाजा कशा वाटत नाहीत? काही युद्ध-धर्म आहे की नाही? ठीक आहे. हा मी चाललो.'

असे म्हणून सिंह तडकाफडकी गुहेच्या बाहेर पडला आणि गेला तो थेट सर्पांशी बोलणी करायला.

'आम्हांला मदत करा.' सिंह भुजंगाला म्हणाला, 'आम्ही संकटात आहोत. हे पक्षी आमची लहान लहान पिले पळवून नेऊ लागले आहेत. किती झालं तरी आपण जमिनीवर हिंडणारे. पक्षी हे तुमचे शत्रू आहेत. त्यांतल्या त्यांत गरुड हा तर तुमचा शत्रू नंबर एक! पक्षी आमचेही शत्रू आहेत. तुमचे आणि आमचे दोघांचे शत्रू एकच. त्या अर्थी आपण खऱ्या अर्थाने मित्र आहोत.'

सर्पांना सिंहाचे म्हणणे पटले. भुजंग म्हणाला : 'खरं म्हणजे तुम्हांला अशा वेळी आम्ही मदत केली पाहिजे. पण...'

'पण काय?' सिंहाने अधीर होऊन विचारले.

'मुंगसापासून आम्हांला रक्षण मिळाले पाहिजे. कबूल आहे ही अट?' भुजंगाने अट सांगितली.



'काही हरकत नाही. मी करतो सारी व्यवस्था. त्याची काळजी नका करू.' सिंह म्हणाला.

'मग ठीक आहे. आम्ही तुम्हांला मदत करायला तयार आहोत.' भुजंगाने सिंहाला वचन दिले.

मग सापांनी निरनिराळे रंग धारण केले. हरळटोळीने हिरवा जर्द रंग घेतला घेतला. ती झाडाच्या पानात दबा धरून बसली. अजगराने झाडांच्या खोडाचा रंग घेतला. काही साप करडा, तपकिरी रंग घेऊन दगडाच्या कपारीत राहू लागले. पक्ष्यांना प्रथम सापांनी केलेली ह्या रंगाच्या आवरणाची कल्पना आली नाही. त्यामुळे सापांच्या दंशाला कित्येक पक्षी बळी पडले. शिवाय रात्रीच्या वेळी साप पक्ष्यांची अंडी, पिले झाडावर जाऊन गुपचूप खाऊ लागले.

साप पशूंना जाऊन मिळाले ही बातमी गरुडाला कळताच त्याचा राग अनावर झाला.

साप दिसला की धर पायात, त्याला उंच ने आभाळात आणि आपट जमिनीवर, असा सपाटा त्याने लावला. घारीने त्याला जोराची साथ केली.



पशू आणि साप मिळून पक्ष्यांचा निर्वंश करू पाहत होते. आणि पक्षी पशूंचा निर्वंश करू पाहत होते. आपण काय करतो आहोत याची शुद्ध कोणालाच नव्हती. गुहेत, घरट्यात रडत होत्या त्या मात्र पिलांच्या आया. त्यांच्या मनात एकच विचार होता, 'हे युद्ध थांबणार कधी?'

पक्ष्यांनी पुन्हा जोर धरला. पशूंना त्यांनी जेरीस आणले. सर्पांची मदत पशूंना अपुरी पडू लागली.

म्हणून सिंहाने सर्व पशूंची पुन्हा एकदा गुप्त सभा घेतली.

पक्ष्यांचा नक्षा कसा उतरावयाचा हा प्रश्न सभेपुढे होता.

कोल्हा म्हणाला : 'मी सांगतो युक्ती. ज्या झाडावर पक्षी राहतात ती झाडेच आपण पाडून टाकू. मग बेटे राहतील कोठे?'

'पण ह्याची जबाबदारी घेणार कोण?' सिंह म्हणाला.

'मला वाटते हे काम हत्ती सहज करू शकेल.' कोल्हा म्हाणाला.

हत्तीने कोल्ह्याच्या म्हणण्याला मान हालवून होकार दिला.

कोल्ह्याची ही युक्ती ऐकून सर्वांनी त्याची वाहवा केली.

गेंड्याने आणि रानडुकराने हत्तीला या कामी मदत करावी असे ठरले.

मग हत्तीला स्फुरण चढले. त्याने आपले सुपासारखे कान हालवले. सोंड वर केली आणि मोठा आवाज केला. जणू युद्धाची तुतारी फुंकली.

मग त्यांनी ठरल्याप्रमाणे झाडावर धडका मारायला सुरुवात केली.

'कडाड् कड् कड् कड् कड्' सुंदर सुंदर झाडे, फळांनी, फुलांनी बहरलेली लहान-मोठी झाडे मोडून पडू लागली.

पशूंनी आरोळ्या द्यायला सुरुवात केली. 'शाब्बास गजराज! वाहवा गेंडेवस्ताद!!'

'पक्ष्यांचा.... नायनाट होवो.' 'पशू.... चिरायू होवोत.'

# ३ : वणवा विझला



ह्या युद्धातून एकच प्राणी बाजूला होता. तो म्हणजे वटवाघूळ. पशू-पक्ष्यांनी एकमेकांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा केली त्या वेळी तेही तळ्यावर होतेच. त्यांची ती प्रतिज्ञा ऐकून वाघळास अतिशय दुःख झाले. अरेरे! आता सर्वांचाच नायनाट होणार! ह्या विचाराने वाघळास भोवळ आली. त्याचा तोल गेला. ते खाली पडले असते, पण त्याच्या मोठ्या पंखांना असलेल्या आकड्यांमुळे ते झाडाच्या फांदीवर उलटे लटकले गेले. तेव्हापासून काही त्याला फांदीवर नीट बसता आले नाही. ते आपले उलटेच टांगून राहिले.

वटवाघूळ म्हणजे उडणारा पशू! ते उडते म्हणून पक्षी, आणि आपल्या पिलांना अंगावर पाजते म्हणून पशू.

ते पशूंप्रमाणे जमिनीवर हिंडत नाही, आणि पक्ष्यांप्रमाणे अंडी घालत नाही.

म्हणून वटवाघळास पशुपक्षी दोघेही आपले वाटत. असल्या सर्व बांधवांचा आपल्या डोळ्यांदेखत होत असलेला नाश पाहून कोण दुःखी होणार नाही? त्याला वाटले की आपण उलटे टांगून झाडावर बसू लागलो आहोत तिकडे तरी कोणाचे लक्ष जाईल. पण छे! तसे काही घडले नाही.

आपण सर्वांना जाऊन समजावून सांगावे का? असा विचार त्याच्या मनात आला. त्याने तसा प्रयत्न केलाही. परंतु त्याला काही यश आले नाही. कोणीही त्याचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. उलट दोघांनाही त्याच्यासंबंधी संशय. प्रत्येकाला वाटे हा शत्रूचा हेर असला पाहिजे.

पण आता मात्र वटवाघळाचा धीर सुटला. जी झाडे पशुपक्ष्यांना सावली देतात, जी दोघांना रसाळ पाने आणि फळे देतात, ज्यांच्यामुळे पाऊस पडतो, ती आपल्या सर्वांना जगवणारी झाडेच हे पशू पाडत आहेत. आणि का, तर पक्ष्यांसंबंधी वाटणाऱ्या द्वेषामुळे. अरेरे! एक दिवस हे सारेच बेट उजाड होणार!

मग हे सारे पशुपक्षी राहतील कोठे? खातील काय? ह्यांना सावलीला तरी कोण उभे करणार? हे दोघेही आपल्याच पायाने आपल्या शेपटीवर धोंडा मारून घेत आहेत.

वटवाघळाने पुन्हा निश्चय केला की, आपण पशूंना भेटायचे. रात्र झाली तसे ते बाहेर पडले आणि थेट सिंहाच्या गुहेत शिरले. तेथे पशूंची सभा चालली होती.

हत्तीने पाडलेल्या झाडांवरची पक्ष्यांची घरटी शोधून त्यांतील पिले, अंडी कोणी कोणी फस्त करावी त्याची वाटणी चालली होती.

हत्तीची वाहवा चालली होती.

झाडांवर जोराने धक्के मारल्याने गेंड्याला टेंगळे आली होती. त्याला औषध म्हणून सांबर आपले शिंग उगाळत होते आणि माकड त्याचा लेप गेंड्याला आलेल्या टेंगळांना लावत होते.

वटवाघूळ गेले ते थेट सिंहाजवळ. सिंहाला त्याने लवून नमस्कार केला आणि म्हणाले : ‘मी तुमच्याशी चार शब्द बोलायला आलो आहे.



पक्ष्यांच्या मनात काय चालले आहे ते सांगायला आलो आहे.'

पशूंना वाटले पक्ष्यांच्या मनात आपण झाडे पाडीत असल्याने नक्कीच चलबिचल झाली असली पाहिजे! वाघळाचे बोलणे ऐकून सर्वजण म्हणाले : 'सांगा, पक्ष्यांचे काय म्हणणे आहे ते.'

वटवाघूळ म्हणाले : 'बंधूंनो, थोडा वेळ शांत चित्ताने विचार करा. आज तुमचे युद्ध चालले आहे खरे, पण त्यात तुमचा आणि पक्षीबांधवांचा म्हणजे सर्वांचाच नाश होणार आहे याची तुम्हांला कल्पना आहे का? तुम्ही पक्ष्यांना मारण्याच्या हेतूने झाडे पाडीत आहात. झाडे आपणा सर्वांनाच सावली देतात. शत्रूपासून लपायला आसरा देतात. गोड गोड पाने, फळे, देतात. त्यांच्यामुळे जास्त पाऊस पडतो. पावसामुळे ही धरणीमाता हिरवी आहे. तुम्ही पक्ष्यांच्या द्वेषामुळे स्वत:चाच नाश ओढवून घेत आहात. तुम्ही हेच काम आणखी काही दिवस चालवले तर हे सारेच बेट उजाड होईल. याचा विचार तुम्ही केला आहे काय?'

वटवाघळाचा हा रोकडा सवाल ऐकून सर्व पशू निरुत्तर झाले

मात्र वाघळाला जोराचा पाठिंबा मिळाला तो मादीवर्गाकडून. सर्व जणी म्हणाल्या : 'वाघूळ म्हणते ते खरे आहे. ह्यावर आपण विचार केला पाहिजे. आमची पिले आम्हांला पाहिजे आहेत.'

कोल्हा वटवाघळाकडे पाहून म्हणाला : 'पक्ष्यांचे काय मत आहे?'

'पक्ष्यांचे काय मत आहे ह्यापेक्षा तुमचे ह्या बाबतीत काय मत आहे ते आधी ठरवा.' वाघूळ म्हणाले. 'तुम्हांला पूर्वीप्रमाणेच आनंदाने जगायचे आहे की सर्वांचाच नाश करायचा आहे.'

'आनंदाने जगायचे आहे.' अनेक जण ओरडले.

'ते ठीक आहे हो. पण काही झाले तरी तळे आमचे आहे. आम्हां पशूंचे आहे.' लांडगा म्हणाला. गिधाडाकडून झालेला अपमान लांडग्याच्या मनात सलत होता.

काही पशूंनी लांडग्याला उचलून धरले. ते म्हणाले : 'होय! लांडगेदादा म्हणतात ते खरे आहे. आम्ही युद्ध थांबवू, पण तळे आमचे आहे.'

मग सर्वांचे लक्ष वटवाघळाकडे लागले. आता ते काय उत्तर देणार म्हणून सर्वांनी आपले प्राण कानात आणले.




‘मी विचारीन त्या प्रश्नांची उत्तरे द्याल?’ वटवाघळाने उलट प्रश्न केला!

‘हो.’ लांडगा एकटाच ओरडला. सिंहालाही जरा बरे वाटले.

‘ठीक आहे. पक्षी तुझे शत्रू आहेत ना?’

‘होय आहेतच.’ काही जण ओरडले.



‘मग ह्या बेटावरचा सर्व प्रकाश ह्या गुहेत का नाही भरून ठेवत? म्हणजे त्यांना काही दिसायचं नाही. मग पाडा त्यांचे मुडदे!’

‘हे कसं शक्य आहे? प्रकाश सर्वांसाठी आहे. सूर्यनारायण तो आपल्या सर्वांसाठी पाठवतो.’

‘ठीक आहे. मग सर्व हवा ह्या गुहेत का नाही भरून ठेवत? म्हणजे त्यांना श्वासच घेता येणार नाही. मरून जातील एकदाचे.’

‘ते कसं शक्य आहे? हवा तर सर्वांसाठीच आहे.’ लांडगा उत्तरे देत होता.

‘आणि तुमचं ते तळं पावसाच्या पाण्यानं भरतं. पाऊस तुम्हीच पाडत असाल नाही?’

‘पाऊस तर ढग पाडतात. पावसाचं पाणी सर्वांसाठी आहे.’

‘मग फक्त तळं पशूंचं का म्हणून? ते तुमचं तसं पक्ष्यांचंही आहे. आहे की नाही बोला?’

वटवाघळाच्या ह्या प्रश्नाने लांडगा निरुत्तर झाला.

‘त्याबरोबर अनेक पशूंनी टाळ्या वाजविल्या. ओरडाओरड केली.

‘युद्ध थांबवा, युद्ध थांबवा!’

मग वटवाघूळ गंभीरपणाने म्हणाले : ‘बंधूंनो, पशू काय किंवा पक्षी काय, ह्या धरतीवरचे सर्व प्राणी ही ईश्वराची लेकरं आहेत. त्यानं ह्या चिमुकल्या बाळांसाठी हा प्रकाश, ही हवा, हे पाणी, ही जमीन, हे आकाश तयार केलं आहे. त्यावर जो मालकी सांगेल तो मूर्ख आहे. तो त्या ईश्वराचा अपमान करतो. ते तळं आहे देवाचं.’

वारा कोणत्या दिशेने वाहतो हे सिंहाने ओळखले. त्याला विचार करणे भाग पडले. सिंह म्हणाला : ‘पक्षी युद्ध थांबवायला तयार असतील तर आम्हीही त्याचा अवश्य विचार करू.’

‘ठीक आहे.’ वाघूळ म्हणाले : ‘तुम्हांला ह्याचे उत्तर लवकरच मिळेल. मात्र उद्या सबंध दिवस एकही झाड पाडू नका.’

‘ठीक आहे. पक्ष्यांकडून उत्तर येईपर्यंत आम्ही वाट पाहतो.’ सिंह म्हणाला.

‘मग पहाटे वाघूळ गुहेच्या बाहेर पडले. उंच झाडावर गरुड बसला होता, त्याच्याजवळ जाऊन बसले.



'गरुडदादा,' वाघूळ म्हणाले : 'हा आताच पशूंचा निरोप घेऊन आलो आहे. तुम्ही युद्ध थांबवत असल्यास ते थांबवायला तयार आहेत.'

'पण त्याला पुरावा काय?' गरुड म्हणाला.

'आज बेटावरचं एकही झाड पशूंकडून पाडलं जाणार नाही, मग तर झालं?' वाघूळ म्हणाले.

गरुडही विचार करीत होता की बेटावरची सर्व झाडे नाहीशी झाली तर आपण राहायचे कोठे?

'खरं सांगतोस?' गरुड उत्सुकतेने म्हणाला.

'मी खोटं कशाला सांगू?' वाघूळ म्हणाले.

‘अरे, तुम्ही काय किंवा पशू काय, दोघेही माझे भाऊ. तुमच्याकडे खोटं बोलून मला काय मिळणार?’

‘ठीक आहे. पशू तयार असतील तर आम्हीही युद्ध थांबवायला तयार आहोत. तू सांगितलेला पुरावा मात्र खोटा ठरता कामा नये.’ गरुड म्हणाला.



मग गरुडाने झालेली हकीगत सर्व पक्ष्यांना समजावून सांगितली. सर्वांना मनातून आनंद झाला.

वटवाघळाचा पुरावा खोटा ठरला नाही. त्या दिवशी झाडे पाडली नाहीत. त्यामुळे पक्ष्यांनीही युद्धविराम जाहीर केला; आणि तह घडवून आणण्याचे काम वाघळावरच सोपविले.

मग वाघळाने एक योजना तयार केली. सर्व पशूंनी आणि पक्ष्यांनी तळ्यावर जमावे. वाघळाने प्रथम घोषणा करावी आणि त्याला सर्व पशुपक्ष्यांनी साथ करावी.

योजनेप्रमाणे सर्व पशुपक्षी तळ्यावर जमले. वटवाघूळ मधोमध टांगून उभे राहिले.

त्याने घोषणा केली : 'तळे कोणाचे?'

'देवाचे' सर्व जण एका आवाजात ओरडले...'

वाघूळ म्हणाले : 'पशुपक्ष्यांच्या एकजुटीचा...'

'विजय असो!'

'बेट पाचूचे सर्वांचे!' वाघूळ ओरडले.

'नाही कोणा एकाचे!!' सर्वांनी साथ दिली.

'बेट पाचूचे कोणाचे?' पुन्हा वाघूळ ओरडले.

'देवाचे, देवाचे!' सर्वांनी पुन्हा साथ दिली.

मग सर्व जण एकमेकांना भेटले. अगदी कडकडून. वटवाघळाच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. त्याच्या शिष्टाईस यश आले होते ना!

मग सर्वांनी ठरविले की, आपण मोठा उत्सव साजरा करू या. आनंदी आनंद करू या. युद्ध संपल्याच्या आनंदाने सर्व बेहोष झाले आणि गाणे म्हणून नाचू लागले.

आनंदाने नाचू या    आनंदाने गाऊ या
आपण सारे भाई भाई    फुलवू आपण धरती माई
आनंदाने राज्य करू    उत्साहाने फेर धरू
आपण सारे नाचू या    आपण सारे गाऊ या

# ४ : आनंदी आनंद

म. ग्रं. सं. ..., वाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. 3000 दिनांक 9८/७/८४
विषय बा.वा. क्र.......

उत्सवाचा दिवस ठरविण्यात आला. मग त्यासाठी कामे वाटून देण्यात आली.

माकडाकडे समारंभाच्या आखणीचे काम देण्यात आले. माकडाने डोके खाजवून खाजवून नाना प्रकारचे कार्यक्रम शोधून काढले आणि त्यांची जबाबदारी वाटून दिली.

युद्ध संपले तशी निसर्गदेवताही प्रसन्न झाली. नाही तर त्या पाचूच्या बेटाला कोण अवकळा आली होती! बेटावर मेलेल्या पक्ष्यांची पिसे इकडेतिकडे उडत होती. पशूंच्या हाडांचे सांगाडे ठिकठिकाणी पडलेले होते. त्यातून ठिकठिकाणी झाडेही पडलेली, त्याला पाचूचे बेट कोण म्हणाले असते? पण हे सर्व नीट, ठाकठीक करायचे असे निसर्गदेवतेने ठरविले. तिलाही कोण आनंद झाला! युद्ध संपले, विध्वंस थांबला. आनंदाश्रू वाहू लागले तिच्या डोळ्यांतून, ते पावसाच्या रूपाने बेटावर कोसळले. सर्व बेटाला तिने न्हाऊमाखू घातले. बेटावरची घाण पार धुऊन निघाली. मग झाडेही खुलली, फुलली. धरणीमातेने आपल्या मुलांचा अपराध पोटात घातला. पडलेल्या झाडांच्या ठिकाणी त्या झाडांची छोटी छोटी रोपे तिने उभी केली. आता पाचूचे बेट पूर्वीप्रमाणे शोभू लागले.

शेवटी तो मंगल दिवस उजाडला. पहाट झाली तशी पक्ष्यांनी गायला सुरुवात केली. कोकिळ पक्ष्याने सर्वांकडून गाणी बसवून घेतली होती. कलहंस मध्ये उभा राहिला. त्याच्याभोवती गाणारे छोटे पक्षी उभे राहिले. छोटा श्याम, बुलबुल, चीरक, दयाळ, चंडोल सर्व आपल्या पथकासह उभे राहिले. मग कोकिळ पक्ष्याने मान हलवून खूण केली. एक तान मारली, 'कुहू कुहू'



कोकिळाने गाण्यास सुरुवात केल्यावर सर्वांनी त्या सुरात आपला सूर मिळविला. सर्व जण गाऊ लागले.

सर्व प्राण्यांना जाग आली. पहाटेला सुंदर सनई वाजवावी तसे गाणे झाले! इतके सुंदर गाणे त्या बेटावर तोपर्यंत कोणी कधी ऐकले नव्हते.

मग सर्व जण उठले आणि तलावावर आंघोळीसाठी गेले. सर्वांना आंघोळ घालण्याचे काम हत्तीकडे दिले होते. हत्ती पाण्यात शिरला. त्याने आपल्या सोंडेत पाणी भरले आणि सर्वांच्या अंगावर पाण्याचा फवारा मारला. किती वेळ तरी आंघोळीचा कार्यक्रम चालला होता. सर्वांनी खूप वेळ आंघोळ केली. मनातली घाण गेली तशी अंगावरचीही घाण धुऊन निघाली. सर्व जण नाचत होते. हत्ती कारंजीच्या कारंजी हवेत सोडत होता. सर्व जण त्याखाली भिजत होते.

सर्वांची आंघोळ झाल्यावर कस्तुरीमृगाने सर्वांना अत्तर लावले. काही पक्ष्यांनी सुवासिक फुले उधळली.

मग करमणुकीच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली.



पहिल्या प्रथम कोकिळेच्या गायनपथकाने शांति-गीत म्हटले. सुतार पक्षी आणि पारवा ह्यांनी ताल धरला. सुतार पक्षी आपली चोच लाकडावर आपटत होता— 'टक्क टक्टक्.' आणि पारवा घुमत होता, 'घुम् घुम्.'

टक्क टक्टक् घुम्घुम् टक्! टक्क टक्टक् घुम्घुम् टक्!

मग झाला नाचाचा कार्यक्रम. प्रथम दोन राजंहस पक्षी पंख पसरून मोठ्या डौलाने पुढे आले. त्यांच्यामागे कोण आहे हे काही दिसेना. मग तुतवार पक्ष्याने तुतारी फुंकली, 'टिइ टिइ टिइ' राजहंसांनी पंख मिटले. जणू पडदा उघडला. दोघे राजहंस एकमेकांच्या विरुद्ध दिशेला निघून गेले.

त्यांच्या मागे स्टेजवर नाचरे पक्षी उभे होते. ते सप्तसुरांत गाऊन नाचू लागले. सर्वांनी टाळ्या पिटल्या.

मग मोरांचा नाच झाला. मधोमध लांडोरी उभ्या राहिल्या आणि मोरांनी पिसारा फुलवून फेर धरला.

माकडांनी कसरतीचे कार्यक्रम केले. कोलांट्या उड्या मारून

दाखवल्या. उलटी, सुलटी, हवेतल्या हवेत, झाडावरून खाली, खालून झाडावर.

मग त्यांनी एक मनोरा रचला. दहा माकडांनी एक गोल केला. त्यावर नऊ उभे राहिले. त्यावर आठ, आठावर सात, असा थेट एकपर्यंत आकडा गेला. उंचच उंच मनोरा तयार झाला! सर्वांत वरच्या माकडाने झाडाची फांदी पकडली. त्याचे शेपूट खालच्या माकडाने पकडले. दुसऱ्याने तिसऱ्याचे आणि तिसऱ्याचे चौथ्याने. अशी एक लांब साखळी जमिनीपर्यंत तयार झाली. मग सर्व माकडे त्या साखळीवरून सरासर झाडावर चढून गेली.

सर्वांनी कडकडून टाळ्या पिटल्या.

मग शर्यतीचे कार्यक्रम झाले. सिंह, वाघ, हत्ती, गेंडा, डुक्कर, लांडगा, कोल्हा, अस्वल, हरीण, कांगारू, सांबर सर्व जण एका ओळीत उभे राहिले.

कोल्हा सिंहाच्या कानात कुजबुजला : 'आपण प्रत्यक्ष ह्या वनाचे राजे. आपण आमच्याबरोबर खेळात भाग घेणे योग्य नव्हे.'

सिंह म्हणाला : 'आता कोणी राजा नाही. कोणी प्रजा नाही. सर्व समान, सर्व आझाद.'

जिराफ व उंट यांच्या माना उंचच उंच असल्याने साहजिकच त्यांच्याकडे पंचाचे काम आले. समोरच्या डोंगराला पाय लावून यायचे असे ठरले.

शहामृग म्हणाला : 'मी पण येतो शर्यतीत. मी दोन पायांचा असलो तरी पळण्यात कमी नाही.' मग शहामृगालाही शर्यतीत सामील केले गेले.

सर्व जण तयारीत राहिली. पोपटाने शिटी मारली. सर्वजण भरधाव पळत सुटले.

पहिला नंबर आला वाघाचा. सांबराची शिंगे अडकली झाडात. त्यामुळे तो राहिला ढेग. हत्ती जरी गलेलठ्ठ असला तरी काही फार मागे राहिला नाही. शहामृगाने कित्येकांना हरवले.

कोल्ह्याने मात्र लुच्चेगिरी केली. तो वाघाच्याही अगोदर आला! पण जिराफाने त्याला वाटेतूनच परतताना पाहिले होते. सर्व जण जागी आल्यावर पंचाने कोल्ह्याची लबाडी जाहीर केली.

सिंहाला कोल्ह्याचा राग आला. त्याने त्याला थप्पड मारण्यासाठी आपला पंजा उगारला. त्यामुळे खेळीमेळीचे वातावरण बिघडले. पण कोकिळ पक्ष्याचे सिंहाकडे लक्ष होते. त्याने आपल्या गायन पथकाला खूण केली. मंजुळ गायन सुरू झाले. त्यामुळे सिंहाचा राग पळाला. रंगाचा बेरंग होणार होता तो टळला.

ह्या लबाडीबद्दल पंचांनी कोल्ह्याला शिक्षा ठोठावली. 'कोल्ह्याने खेळात लबाडी केल्याबद्दल त्याने अस्वलाचे केस मोजत बसले पाहिजे. सर्व केस मोजून झाल्याशिवाय त्याला दुसरी कोणतीही गोष्ट करता येणार नाही!'

शिक्षेचा हा नवा प्रकार पाहून सर्वांना गंमत वाटली. वातावरण पुन्हा खेळीमेळीचे झाले.

पुन्हा खेळ सुरू झाले. आत पक्ष्यांच्या शर्यती. प्रथम पोहण्याच्या शर्यती झाल्या. त्यात राजंहस, कलहंस, कादंब, मराल, काणूक,



चक्राक, चक्रवाक, कारडव, बदक ह्या पक्ष्यांनी भाग घेतला. सर्वजण कसे सपासप पोहत होते. त्यांत कारंडव हंसाच्या मानाने छोटा असूनही पहिला आला.

मग निरनिराळ्या पक्ष्यांनी पाण्यात सूर मारून मासे पकडून दाखविले. खंड्या, त्याचे थोरले भाऊ बंड्या आणि कवड्या ह्यांनी पाण्यावर झेप घेऊन सफाईने चोचीत मासे पकडले. हे छोटे लांब चोचीचे पक्षी पाण्यावर झेप घेताना पाहून पशूंना गंमत वाटली.

पण त्यांच्याहून कमाल केली सुरय पक्ष्याने. तो झाडावरून केव्हा पाण्यात शिरला हे कित्येकांना कळलेसुद्धा नाही इतका त्याचा वेग. पाण्यातून तो बाहेर आला तेव्हा काही जण कुजबुजले : 'अरे, हा पाण्यात शिरला होता कधी?'

सुरय पक्ष्याने गंमत करून दाखवली. त्याने धरलेला मासा हवेत उडवला आणि हवेतल्या हवेत चोचीने चेंडूसारखा झेलून गट्टम् करून टाकला!

सर्व जण ओरडले : 'शाबास, शाबास!'

मग पाळी आली कैकरावर. तो खूप उंच झाडावर बसला होता टेहळणी करीत. मासा दिसला तसा झपाट्यात खाली आला. पाण्यात शिरला आणि माशाला पायात धरून वर आला.

सर्वांनी टाळ्या पिटल्या. गंमतच गंमत!

असे हे करमणुकीचे कार्यक्रम संपल्यावर कोकिळ पक्ष्याच्या गायनपथकाने बेटगीत म्हटले. सर्व जण त्या वेळी उभे राहिले. सर्वांनी त्याला साथ केली.

मग सर्वांनी एके ठिकाणी जेवण केले. सर्वजण एकमेकांना आग्रह करीत होते, 'भरपूर खा. पोटभर खा.'

बेटावरचा हरवलेला आनंद पुन्हा बेटावर आला. आनंदाचे राज्य पुन्हा सुरू झाले. पूर्वीप्रमाणे सर्व गुण्यागोविंदाने राहू लागले.

# ९ : एकजुटीची कसोटी

सर्व जण आता अगदी खुषीत राहत होते. एकमेकांना मदत करीत होते. प्रत्येकाला दुसऱ्याच्या सुखासाठी काही ना काही काम त्याच्या कुवतीप्रमाणे देण्यात आले होते.

पण एके दिवशी काय झाले, समुद्रातली एक सुसर आली तळ्यात राह्यला. म्हणाली, 'समुद्रातले मासे खाऊन कंटाळा आला. आता ह्या बेटावर जाईन आणि दुसरी कोणती तरी शिकार मिळते का ते पाहीन.' म्हणून सुसर गुपचूप लपून राहिली पाण्यात आणि तिला सापडला कोण, तर हत्ती.

हत्ती गेला नेहमीप्रमाणे आंघोळीसाठी तळ्यावर. तर सुसरीने त्याचा पाय धरला. हत्ती तिला जमिनीकडे खेचू लागला. ती हत्तीला पाण्यात खेचू लागली. सुसरही काही कमी ताकदवान नव्हती. पण हे पाहिले खंड्याने. तो आला होता तळ्यावर मासे पकडायला. खंड्याने ताबडतोब पशुपक्ष्यांना बातमी दिली—

'गजराज धोक्यात आहेत! तळ्यावर चला.'

सर्वजण धावत उडत तळ्यावर आले. पाहतात तो खंड्याने सांगितलेले खरेच! हत्तीचा मागचा पाय सुसरीने धरला होता. मग हत्तीने जिराफाच्या मानेला सोंडेने मिठी मारली. तशी जिराफाने उंटाची शेपूट पकडली, उंटाने झेबऱ्याची, झेबऱ्याने सिंहाची, सिंहाने वाघाची, वाघाने लांडग्याची, लांडग्याने कोल्ह्याची, कोल्ह्याने सशाची, आणि सशाने खारीची शेपूट धरली.

मग माकड ओरडले : 'एक, दोन, तीन.'

सर्वांनी जोर लावला. सुसर झटक्यात जमिनीकडे ओढली जाऊ



लागली. मग गरुडाने झेप घेतली. आणि अशी चोच मारली की नाही सुसरीच्या पाठीवर, काही विचारू नका. त्यामुळे सुसरीची मिठी सुटली.

सुसरीची मिठी एकदम सुटल्याने सर्व पशूंचा तोल गेला. धपकन् जमिनीवर आदळले असते आणि खार, ससा चेंगरून खलास झाले असते. पण सर्वांनी एकमेकांना सावरले.

सर्व जण ओरडले : 'एकजुटीचा विजय असो!'

सुसर पाण्यात पळू लागली. पण तिला पाण्यात कोण जाऊ देतो! सर्व पशुपक्ष्यांनी तिला घातला गराडा.

थांब, पळतेस कुठे?' सर्व जण म्हणाले.

सुसर घाबरून गेली. जागच्या जागी थांबली. सर्वांची ही विलक्षण एकजूट पाहून ती आश्चर्यचकित झाली. म्हणाली : 'हे पशुपक्ष्यांनो, तुम्ही

मला क्षमा करा. तुमची ही एकजूट पाहून मी खरोखरच आश्चर्यचकित झाले आहे. मला क्षमा करा. मला तुमच्यात घ्या. मला तुमची समजा. मी तुमच्या उपयोगी पडेन.'

मग सुसरीला एकजुटीत घेण्यात आले. तिच्याकडेही काम सोपविण्यात आले. सुसरीने सर्वांना तलावात फिरवून आणावे.

माकडाने शंका काढली : 'आपण तिच्या पाठीवर बसलो आणि सुसरीने पाण्यात डुबी घेतली तर?'

सुसरीने हे बोलणे ऐकले. ती म्हणाली : 'एकमेकांविषयी वाटणारा विश्वास म्हणजेच एकजुटीची कसोटी. चला बसा माझ्या पाठीवर. मी फिरवून आणते तुम्हांला.'

मग माकडानेच पहिला नंबर लावला. माकड सुसरीवर बसले. हरीणही बसू लागले. तेव्हा सुसर म्हणाली : 'एकदम जास्त बसू नका हो. नाही तर मी तुमच्या वजनाने पाण्याखाली जाईन. आपण एकेकाची पाळी करू.' असे म्हणून ती माकडाला घेऊन तलावात शिरली.

माकड गाणे म्हणून लागले—

सुसरीबाई सुसरीबाई पाठ मऊ
तुझी पाठ मऊ
आपण सगळे बहीण भाऊ
खेळू, हासू आणि गाऊ
आनंदाने येथे राहू
सुसरीबाई सुसरीबाई पाठ मऊ
तुझी पाठ मऊ

BVBK-0403000
म. गं. सं. ..., बालमानस शाखा,
बाल वाङ्मय विभाग
क्र. 3000 दिनांक 9/1/08